Reg. No. NP CITY/236/2018-2020.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १७-२३, २०२२/माघ २८-फाल्गुन ४, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०.

**सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा**

**सहसंचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक प्रा.यो.यवत-कलम-२०(३)-प्र.क्र.ब(५)-सभा-१३-२०२२-सहसंचाअम-१९८.—

ज्याअर्थी, यवतमाळ प्रादेशिक योजना (यापुढे “ उक्त प्रादेशिक योजना ” असे संबोधिले आहे) शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे “ उक्त अधिनियम ” असे संबोधिले आहे) चे कलम १५ (१) अन्वये अधिसूचना क्रमांक टिपीएस-१८१६-९९४-प्र.क्र.५१६-१६-नवि-१३, दिनांक ०१ जानेवारी, २०१८ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक ०२ मार्च, २०१८ पासून अंमलात आलेली आहे . तसेच प्रादेशिक योजना यवतमाळ अंतर्गत किन्ही विकास केंद्राचे (यापुढे “ उक्त विकास केंद्र ” असे संबोधिले आहे) प्रस्तावित जमीन वापर नकाशे मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक डिटीपी-प्रायो-यवतमाळ-यवतमाळ विकास केंद्र नकाशा-टिपीव्ही-६-६१४०, दिनांक १३-१२-२०१९ अन्वये मंजूर असून ते दिनांक ०७-०३-२०२० पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेतील उक्त विकास केंद्र नकाशानुसार मौजे किन्ही, ता. जि. यवतमाळ येथील गट क्र. २ मधील २.२२ हे. आर., गट क्र. २२१ मधील २.०२ हे. आर., गट क्र. २२२ मधील २.०२ हे.आर., गट क्र. २२३ मधील २.०२ हे.आर., व गट क्र. २५५ मधील २.१९ हे.आर. अशी एकूण १०.४७ हे.आर. जमीन भाग नकाशात दर्शविलेल्या प्रमाणे (यापुढे ज्यास “ उक्त जमीन ” असे संबोधले आहे) ना विकास विभागात समाविष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, शासन निर्णय क्रमांक टिपीएस-१८१५-प्र.क्र. ४९/१५-नवि-१३, दिनांक ६ मे २०१५ अन्वये उक्त अधिनियमाचे कलम-२० अन्वये फेरबदलाद्वारे मंजूर प्रादेशिक योजनेमधील १०.०० हेक्टर ते २५.०० हेक्टर पर्यंतच्या जमीन वापर विभाग बदल करण्यासाठी विभागीय स्तरावर प्रस्ताव छाननी समिती (यापुढे “ उक्त समिती ” असे संबोधिले आहे) स्थापन करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या जमीन वापर बदलाच्या धोरणानुसार उक्त जमिनीच्या वापर विभाग बदलासाठी जमीनधारकांनी दिनांक ०८ जुन २०२१ रोजी आवश्यक त्या कागदपत्रासह उक्त समितीच्या सदस्य सचिवांकडे अर्ज केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या वापर बदल प्रस्तावास मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पत्र क्र. ४९८६, दिनांक २८ ऑक्टोबर २०२१ अन्वये अभिप्राय दिला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त समितीचे दिनांक ०६ जानेवारी २०२२ रोजी झालेल्या सभेमध्ये समितीचे सदस्यांचा सल्ला घेतल्यानंतर, शासनाने उपरोल्लेखित दिनांक ६ मे २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून उक्त अधिनियमाचे कलम २०, पोट-कलम (२) मधील तरतुदीनुसार उक्त प्रादेशिक योजनेत उक्त जमीन ना विकास विभागातून वगळून खालील अटींच्या अधिन राहून रहिवास विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत झाले आहे. (ज्यास यापुढे " प्रस्तावित फेरबदल " असे संबोधले आहे).

**अट क्र. १ :–**प्रस्तावा अंतर्गतच्या जमीनीपैकी गट क्रमांक ०२ क्षेत्र २.२२ हे. या जमिनीस लगतच्या जमिनीमधून आवेदकाने स्वखर्चाने किमान ९.०० मी. रुंदीचा पोचमार्ग उपलब्ध करुन घेणे आवश्यक व बंधनकारक राहील.

**अट क्र. २ :–**फेरबदलाखालील क्षेत्राचा अभिन्यास करतांना एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील प्रादेशिक योजनेच्या विनियमानुसार त्यामध्ये अनिवार्य किमान १०% खुली जागा व १०% सुविधा क्षेत्र सोडण्यात यावे. (सदर सुविधा क्षेत्र त्याच प्रयोजनार्थ जमीन मालक/विकासक यांना विकसित करता येईल.)

**अट क्र. ३ :–**फेरबदलाखालील क्षेत्रात पायाभूत सुविधा जबाबदारी जमीन मालकांनीं/विकास कर्त्यांनी स्वतःच्या खर्चाने विकसित करणे व पुरविणे बंधनकारक राहील. (जसे प्रवेशमार्ग, पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा इत्यादी).

**अट क्र. ४ :–**शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. टिपीएस-१८१५/प्र.क्र. ४९/१५/नवि-१३, दिनांक ६ मे २०१५, दिनांक ११ जून २०१५ व दिनांक ०४ जानेवारी २०१६ अन्वये निर्धारीत केल्याप्रमाणे अधिमूल्याचा व इतर शुल्क भरणा करण्याची जबाबदारी जमीन मालक/विकासक यांची राहील. तसेच संपूर्ण प्रस्तावित फेरबदलाखालील क्षेत्रावरील अधिमूल्याचा भरणा करणे बंधनकारक राहील.

**अट क्र. ५ :–**फेरबदलाखालील जमिनीत जर अभिन्यासात भूखंड पाडून विक्री करणे प्रस्तावित असेल तर अभिन्यासातील मूलभूत सुविधांचा विकास व भूखंड विक्रीसाठी खालीलप्रमाणे बंधने राहतील. जिल्हाधिकारी यांनी सदर बाबीवर नियंत्रण ठेवावे.

| | | |
|---|---|---|
| (अ) अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यानंतर | . . | एकूण २५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ब) सुमारे ४०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण ५०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (क) सुमारे ६०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण ७५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ड) सुमारे ८०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण ९०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ई) सुमारे १००% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |

तसेच, जर अभिन्यासात समूह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर, जिल्हाधिकारी, अमरावती यांनी विहित केल्यानुसार सर्व मूलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

**अट क्र. ६ :–**सदर अभिन्यासामध्ये रहिवासी विकास झाल्यानंतरच तेथील रहिवासी कुटुबांचे मागणीनुसार पाण्याची गरज लागेल ती गरज अभिन्यास धारकाला करावी लागेल. पाणी पुरवठा व्यवस्था अभिन्यास धारकाने करणे आवश्यक आहे.

**अट क्र. ७ :–**महाराष्ट्र भुजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ नुसार सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या उद्भवापासून ५०० मी. अंतरात नवीन सिंचन विहीर घेता येणार नाही.

**अट क्र. ८ :–**दोन विहीरीमधील (अस्तित्वातील अथवा प्रस्तावित) अंतर १५० मीटर ठेवावे व त्यापेक्षा कमी अंतरावर नवीन विहीर घेवू नये.

**अट क्र. ९ :–**प्रस्तुत फेरबदलाखालील जमिनीस मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नुसार व सदर नियमावलीत शासन नगर विकास विभागाकडील वेळोवेळी निर्गमित केलेल्या शुद्धीपत्रकानुसार विकास परवानगी देण्याची कार्यवाही करावी.

वरिल कोणत्याही अटींचे उल्लंघन झाल्यास रेखांकन व अकृषक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील ;

आणि ज्याअर्थी, शासनाचे नगर विकास विभागकडील अधिसुचना क्र. टिपीएस-१८१५/प्र.क्र.४९/१५/नवि-१३, दिनांक ११-०६-२०१५ अन्वये संबंधित विभागीय सहसंचालक तथा सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती यांना उक्त अधिनियमाचे कलम-२०, पोट-कलम (३) अन्वये अधिसूचना निर्गमित करण्याचे अधिकार प्रत्यायोजित करण्यात आलेले आहेत.

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-२०, पोट-कलम (३) व त्या अनुषंगाने प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती उक्त जमिनीच्या वापरात फेरबदल करण्याचा इरादा जाहीर करीत आहे व प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने नागरिकांकडून हरकती व सूचना योग्य त्या कारणांसह, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या मुदतीत लिखित स्वरूपात मागविण्यात येत आहेत.

हरकती/सूचना सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, यवतमाळ, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, यवतमाळ यांच्याकडे पाठविण्यात याव्यात. विहित मुदतीत सूचना/हरकती दाखल करणा-यांना सुनावणी देण्याकरीता व सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती, अमरावती यांना अहवाल सादर करण्याकरीता समितीतर्फे अधिकारी म्हणून सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, यवतमाळ, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, यवतमाळ यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

(१) सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती. " निलगिरी " डॉ. अग्रवाल यांची इमारत, काँग्रेस नगर रोड, अमरावती.

(२) सहाय्यक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा कार्यालय, यवतमाळ, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, यवतमाळ.

अमरावती :
दिनांक १० फेब्रुवारी २०२२.

**रा. दा. लांडे,**
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती
तथा
सहसंचालक, नगर रचना,
अमरावती विभाग, अमरावती.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११.

BY MEMBER SECRETARY, ZONE CHANGE COMMITTEE AND
JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. R.P.Yavt.-Sect-20(*3*)-C.R.B(5)-Meeting-13-2022-JDTPAMT-198.—

Whereas, the Regional Plan of Yavtmal Region (hereafter referred in as the " said Regional Plan ") has been sanctioned by Government Urban Development Department under Section 15(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act ") *vide* Notification No. TPS-1816-994-CR-516-16-UD-13, dated the 1st Jan, 2018 and has come into force with effect from the 2nd March, 2018. And under Regional Plan of Yavatmal Region the proposed land use plan of Kinhi growth center (hereafter referred in as the "said Growth Centre") has been sanctioned by Hon. Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* Notification No. DTP-RP-Yavatmal-Yavatmal Growth Centre Plan-TPV-6-6140, dated 13th December, 2019 and has come into force with effect from 7th March, 2020. ;

And whereas, as per said Growth Centre Map in the said Regional Plan, the land admeasuring 10.47 Ha. bearing Gut. No. 2 area 2.22 Ha., Gut No. 221 area 2.02Ha., Gut No. 222 area 2.02 Ha., Gut No. 223 area 2.02 Ha. Gut No. 225 area 2.19 Ha., of Mouje Kinhi, Tal. , Dist. Yavatmal, as shown on the Part Plan (hereinafter referred to as the " said land ") is included in No Development Zone ;

And whereas, Government has constituted Zone Change Committee (hereinafter referred to as " said Committee ') *vide* Notification No. TPS-1815-C.R.49-15-UD-13, Dated 6th May 2015 for zone change proposals of sanctioned Regional Plan up to the Limit of 10.00 Ha. to 25.00 Ha. Land ;

And whereas, the land owners have submitted a zone change proposal of the said land as per Government Zone Change Policy with all required document to the Member Secretary of the Zone Change Committee, Amravati on Dt.08-06-2021 ;

And whereas, Hon. Director of Town Planning, Maharashtra State, Pune has given no objection to the proposed zone change proposal of said land by his letter No. 4986, Dt. 28-10-2021 ;

And whereas, said committee's meeting was held on 06th January 2022; and after consulting the committee

members " said committee " is of the opinion, that the said land in accordance with the provisions of sub-section (*2*) of Section 20 of the said Act, should be deleted from Agricultural Zone and include in Residential Zone, subject to following conditions. (hereinafter referred to as the " Proposed Modification ").

*Condition No. 1* :—It will be necessary and mandatory for the land owner to make available access road at least 9.00 m. of width at his won cost from the adjoining land for the land under proposal, Gut No. 02, area 2.22 hectare

*Condition No. 2* :—While preparing the layout in respect of the said land under modification, as per regulations in Unified Development Control and Promotion Regulation for Regional Plan it will be mandatory to provide the minimum 10% open space, 10% amenity space. (This amenity space can be developed by the Land Owner/ Developer for the same purpose)

*Condition No. 3* :—It will be mandatory for the Land Owner/Developer to provide all basic infrastructure development *(i.e.* access Roads, Water Supply, Power Supply *etc.)* in the said land under modification at his own expense.

*Condition No. 4* :—It shall be the responsibility of the Land Owner/Developer to Pay Premium and other charges as decided by the Government Urban Development Department *vide* resolution No. TPS-1815-C.R.49-15-UD-13, dated 6$^{th}$ May, 2015 and dated 11$^{th}$ June, 2015 & 04 th January 2016. Also it is necessary to Pay Premium on the entire land under this proposal.

*Condition No. 5* :—If the said lands under modification are proposed to be developed by way of plotted layout, then sale of plots shall be monitored by the Collector, in relation to development of civic amenities as per the stages given below.—

| | | |
|---|---|---|
| (i) | After final approval of lay-out | Sale of 25% of total Plots shall be permissible |
| (ii) | After completion of 40% of Civic Amenities | Sale of 50% of total Plots shall be permissible |
| (iii) | After completion of 60% of Civic Amenities | Sale of 75% of total Plots shall be permissible |
| (iv) | After completion of 80% of Civic Amenities | Sale of 90% of total Plots shall be permissible |
| (v) | After completion of 100% of Civic Amenities | Sale of 100% of total Plots shall be permissible |

Also if, Group Housing Scheme is proposed in the lay-out, then the Occupancy Certificate shall not be given unless civic amenities specified by the Collector are fully developed.

*Condition No. 6* :—Only afther the residential developmnet in this layout, according to the demand of the resident families, the need for water will have to be provided by the layout holder. It will be mandatory for the land owner to provide the water supply in this layout.

*Condition No. 7* :—As per Maharashtra Groundwater (Development and Management) Act 2009, No new irrigation well can be taken within a distance of 500 m. from the source of public drinking water.

*Condition No. 8* :—The distance between two wells (existing or proposed) shall be kept 150 meters and no new well should be taken within this distance.

*Condition No. 9* :—Development permission should be granted in the said land under modification in accordance with the provisions of Unified Development control and Promotion Regulations and as per the corrigendum issued by the Government Urban Development Department form time to time in the said regulation.

In case of non-compliance, layout Approval and Non-Agriculture permission shall be liable to be cancelled ;

And whereas, Government Urban Development Department by Notification No. TPS-1815/C.R.49/15/UD-13,

Dt.11-06-2015 has delegated power to the Joint Director of Town Planning of respective Division and Member Secretary of Zone Change Committee to notifiy under sub-section (*3*) of Section 20 of said Act.

Now, therefore, in exercise of the power confered under sub-section (*3*) of Section 20 of the said Act, the Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati declares its intention to initiate the "Proposed Modification" and invites in writing objections and suggestion with reasons from the general public within 30 days form the date of publication of this notice in the *Maharashtra Government Official Gazette* .

Suggestions/Objections in this regard shall be addressed to the Assistant Director of Town Planning, Yavatmal, Administratiive Building, Ground Floor, Collector Office Premises, Yavatmal who is hereby appointed as the Officer to hear the Suggestions/Objections received within stipulated period and to submit his report on the same to Member Secretary, Zone Change Committee, Amravati.

The plan showing the proposed modification shall be kept open for inspection by the general public during office hours on all working days at the following Offices.

(1) The Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati, " Nilgiri " Dr. Agrawal Building, Congress Nagar Road, Amravati.

(2) The Assistant Director of Town Planning, Yavatmal Branch Yavatmal, Administrative Building, Ground Floor, Collector Office Premises, Yavatmal

R. D. LANDE,
Member Secretary,
Zone Change Committee
And
Joint Director of Town Planning,
Amravati Division, Amravati.

Amravati :
Dated the 10th February 2022.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२.

## मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) च्या अनुषंगाने कलम २३(१) नुसार नगर पंचायत, बार्शीटाकळीची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत

क्रमांक न.प.बार्शीटाकळी-वियो.-२००-२०२२.—

शासनाने, नगर विकास विभागाकडील निर्णय क्रमांक एमयूएन-२०१४-प्र. क्र. ९३-नावि-१८, दिनांक १ ऑगस्ट २०१५ अन्वये बार्शीटाकळी नगर पंचायत स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) अन्वये बार्शीटाकळी नगर पंचायत क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची सुधारित विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) च्या अनुषंगाने कलम २३ (१) अन्वये बार्शीटाकळी नगर पंचायतीने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. २, दिनांक १० जून २०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) नुसार बार्शीटाकळी नगर पंचायतीच्या विकास योजनेमध्ये

समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा नगर पंचायत कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांना याबाबत काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसाच्या आत मुख्य अधिकारी, बार्शीटाकळी, नगर पंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**विजय रुपरावजी लोहकरे,**
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, बार्शीटाकळी.

बार्शीटाकळी :
दिनांक ११ फेब्रुवारी २०२२.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३.

## BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

### Declaration of Intention to prepare GIS Based Development Plan of Nagar Panchayat, Barshitakli (Dist. Akola) as per Section 23 (1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

No. N.P. Barshitakli-Viyo.-200-2022.—

As Per Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* it's Notification No. MUN. 2014-C.R. 93-UD-18,Dated 1st August 2015 constituted Nagar Panchayat, Barshitakli. It is necessary to prepare the Development Plan for the area of Nagar Panchayat, Barshitakli, as per Section 21 (*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, for planned development of the said area.

Hence, the Nagar Panchayat, Barshitakli by it's Resolution No. 2, dated 10th June 2021 has given consent to declare it's intention to prepare Development Plan, as per provision of Section 23 (*1*) read with Section 21 *(2)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The Plan showing boundary of the area included in Development Plan of Barshitakli Nagar Panchayat, is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the Office of the Nagar Panchayat, Barshitakli as required under Section 23(*2*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any Suggestions/objections of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Nagar Panchayat Barshitakli within a period of 60 (Sixty) day's from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestions/objections shall be duly considered while preparing the Development Plan.

VIJAY RUPRAOJI LOHAKARE,
Chief Officer,
Nagar Panchayat, Barshitakli.

Barshitakli :
Dated the 11th February 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.